वाचले:-

१. उद्यान विभागाकडील पत्र क्र. उद्यान/७/कावि/२९१/२०२४ दि.२६/०३/२०२४
२. महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ति वेतन नियम १९८२ मधील नियम १०(१).
३. अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दिनांक २९/०८/२०१३.
४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे निर्णय क्र.:बीसीसी२०१८/प्र.क्र.३०८/१६- ब,दि.२१/१२/२०१९
५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.:बीसीसी२०१९/ प्र.क्र.५८१ ए/१६-ब, दिनांक १४/१२/२०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/३अ/कावि/३२/२०२४
दिनांक१४/०६/२०२४

विषय :- अधिसंख्य पदावर कार्यरत श्री.पौनिकर गणेश नागोराव, लिपिक (संगणक क्रमांक - ८१५९) यांना नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेबाबत..

आदेश,

श्री.पौनिकर गणेश नागोराव यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर लिपिक या पदावर अनुसूचित जमाती या प्रवर्गाकरीता राखीव असलेल्या जागेवर आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/१६७८/२००० दि.२७/०७/२००० अन्वये नियुक्ती देण्यात आलेली होती. त्यांचे हलबा या अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समिती, नागपूर यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक DD/TCSC/NGP/III-617/31/7824/05 दिनांक २७/०९/२००५ अन्वये अवैध ठरविले होते.त्यामुळे त्यांची आदेश क्रमांक प्रशा/२अ/कावि/४६५/२००९ दि.०३/०८/२००९ अन्वये सेवा समाप्त करण्यात आली होती.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे निर्णय क्र.:बीसीसी२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब,दि.२१/१२/२०१९ अन्वये दिलेले निर्देश विचारात घेवून अनु.जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविलेमुळे सेवा समाप्त करणेत आलेल्या श्री.पौनिकर गणेश नागोराव यांना आदेश क्र.प्रशा/४/कावि/४२८/२०२० दि.०१/०६/२०२० अन्वये लिपिक अभिनामाच्या अधिसंख्य पदावर उद्यान येथे ११ महिने कालावधीकरिता नेमणूक देण्यात आलेली आहे. सदरचे शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या/नियुक्त्या देण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना,अधिसंख्य पदावरील ११ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर शासनाकडून वेळोवेळी निर्गत झालेल्या शासन निर्णयानुसार त्यांची पुढील ११ महिने किंवा ते सेवेत राहिले असते तर ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत किंवा अभ्यास गटाच्या शिफारशी शासनास प्राप्त होऊन त्यावर शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत त्यांचे अधिसंख्य पदावरील नेमणूकीस वेळोवेळी मुदतवाढ देणेत आलेली आहे.

श्री.पौनिकर गणेश नागोराव हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "लिपिक" या पदावर दिनांक १०/०८/२००० रोजी रुजू झाले असून सद्यस्थितीमध्ये लिपिक या पदावर कार्यरत आहेत. श्री.पौनिकर गणेश नागोराव यांचा लिपिक पदावरील मुळ रुजू दिनांक ते सेवा समाप्त करणेत आलेल्या दिनांकापर्यंत (दि.१०/०८/२००० ते दि.०३/०८/२००९ पर्यंत) एकुण ८ वर्षे ११ महिने इतके वर्ष सेवा झालेली आहे. तसेच अधिसंख्य पदावरील नियुक्ती दि.०१/०६/२०२० ते त्यांचे सेवानिवृत्तीचे दिनांक ३०/०६/२०२४ अखेर त्यांची सेवा ४ वर्षे २९ दिवस इतकी होत आहे. श्री.पौनिकर गणेश नागोराव, लिपिक यांचे सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख ०१/०७/१९६६ अशी असून दिनांक ३०/०६/२०२४ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पूर्ण होत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृति वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) नुसार वर्ग ३ मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

उप आयुक्त, उद्यान यांनी उपरोक्त वाचले क्र. १ चे पत्रान्वये श्री.पौनिकर गणेश नागोराव, लिपिक यांचेकडून मनपाचे घरकर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहनकर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण निधी कर्ज,सोसायटी कर्ज येणे बाकी नाही. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. असा अहवाल सादर केला असून, त्यांना दि.३०/०६/२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

सबब, उपआयुक्त, उद्यान यांचेकडील दिनांक २६/०३/२०२४ रोजीचा अहवाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियमातील उक्त तरतूद विचारात घेऊन उपरोक्त वाचले क्रमांक ३ वरील आदेशान्वये प्रदान

करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्री.पौनिकर गणेश नागोराव, लिपिक यांना दिनांक ३०/०६/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून अधिसंख्य पदावरुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

श्री.पौनिकर गणेश नागोराव, लिपिक यांची नेमणूक ही अधिसंख्य पदावरील असून वाचले क्रमांक ५ चे शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावरील नेमणूक करणेत आलेल्या अधिकारी / कर्मचा-यांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ अदा करणेसंदर्भातील निर्देश देणेत आलेले आहेत.

श्री.पौनीकर गणेश नागोराव लिपिक यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता सबंधित विभागाने करून प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे. लेखा विभागाने श्री.पौनीकर गणेश नागोराव लिपिक यांचेकडून महापालिकेस घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, वैद्यकीय अग्रीम, इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय? या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास, ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमतः देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.पौनिकर गणेश नागोराव, लिपिक यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.

प्रति,

श्री.पौनिकर गणेश नागोराव, लिपिक

प्रत - लेखा विभाग

२/- श्री.पौनिकर गणेश नागोराव, लिपिक यांचेकडून महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम त्यांना देय असणा-या रकमेतून वजा करुन उर्वरित रकमा त्यांना त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करणेत यावी.

१.लेखापरिक्षण विभाग २.दूरसंचार विभाग ३.माहिती व जनसंपर्क विभाग
४.कामगार कल्याण विभाग ५.माहिती व तंत्रज्ञान विभाग ६.पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ
७.सामान्य प्रशासन टेबल क्र. ७, ९, १०, १२, १४, १६, २२, संगणक कक्ष
८.पिं.चिं.मनपा कर्मचारी.पतसंस्था ९.सर्व संबंधित विभाग १०. उद्यान विभाग